जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## देव... असूर... राक्षस

पुराणकथांतून आधुनिक जीवनाचा अर्थ शोधतांना प्रसिद्ध लेखक, वक्ते देवदत्त पट्टनायक 'द स्टोरीज वी टेल' या पुस्तकात छोटे छोटे लेख देऊन खूपच उपयुक्त व ज्ञानाधारित माहिती आपल्याला देतात. जरूर वाचावे. आज आपण देव म्हणजे सुष्ट व असुर म्हणजे दुष्ट असे मानतो पण असे प्रत्येकवेळी नसते.

असुरांचा संबंध मरणाधीनतेशी जोडलेला आहे तर देवतांचा अमृताशी. असुरांकडे संजीवनी विद्या असते. त्यांच्याकडे मृताचे पुनरुत्थान करण्याची शक्ती असते. देव आणि असुर या दोघांचेही पिता समानच – कश्यप. पण देवांची माता आहे आदिती तर असुरांची माता आहे दिती.

या गोंधळात काय होते की बऱ्याचदा राक्षस व असुर यांच्यामध्ये गफलत होते. राक्षस जंगलात राहतात तर असुर जमिनीखाली पाताळात राहतात. राक्षस यज्ञाला महत्त्व देत नाही तर असुर यज्ञाला महत्त्व देतात. त्यामुळेच शुक्र हे त्यांचे गुरू आहेत.

यज्ञ करणारे ऋषी हे राक्षसांचे शत्रु आहेत तर अमृत पळवणारे देव हे असुरांचे शत्रू आहेत. म्हणूनच कथा, ऐकतांना, वाचतांना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. असुर व राक्षस एकच नाहीत.

असुर सामर्थ्यशाली बनण्यासाठी आवश्यक तपश्चर्या करून अमरत्वासाठी ब्रह्माला पूजतात. ब्रह्मा अमरत्वाऐवजी त्यांना दुसरी महाशक्ती बहाल करतो. त्यातून अहंकारी बनून देवांना त्रास देतात. मग ब्रह्माच्या वरदानातील पळवाट शोधून (विष्णू–महादेव–अन्यशक्ती) असुर–राक्षसांचा पाडाव करतात. हे चक्र युगानुयुगे चालूच आहे.. कालाय तस्मै नमः ...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

## कापूरवाडी व बाराबाभळी येथील दारु अड्ड्यावर कारवाई

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कापूरवाडी शिवारातील मोरे वस्ती जवळ सुरू असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी पंधरा हजार रुपये किमतीचे २०० लिटर कच्चे रसायन व सात हजार रुपयाची गावठी दारू जप्त केली. या कारवाईत पोलिसांनी एका महिलेस ताब्यात घेतले. दुसऱ्या कारवाईत बाराबाभळी येथील दारु अड्ड्यावर छापा टाकून पोलिसांनी एका महिलेस ताब्यात घेऊन तिच्याकडे १ हजार ५०० रुपये किमतीची २० लिटर गावठी दारू जप्त केली. याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्ह्यांची नोंद करण्यात आली.

## शांताबाई हजारे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – तेलीखुंट, शिंपीगल्लीतील रहिवासी श्रीमती शांताबाई गोकुळराव हजारे (वय ७२) यांचे १७ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्याव नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिंपीगल्लीतील श्रेया ग्राफीक्स्चे संचालक गणेश हजारे यांच्या त्या मातोश्री होत.

## रोहित सिसवाल यांचे अल्प आजाराने निधन

नगर – माधवबाग भिंगार येथील रहिवासी रोहित उर्फ रोपू भिमाजी सिसवाल (वय ३५) यांचे १५ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. वाल्मिक समाजाचे सदस्य विकी सिसवाल यांचे ते बंधू होत.



त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगी असा परिवार आहे.

## इसाक लालमोहम्मद शेख यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर – इसाक लालमोहम्मद शेख (वय ८६, सॉ मिल वाले) यांचे १७ मार्च रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.



भगतसिंग चौकातील सिग्मा कम्युनिकेशनचे मालक आसिफभाई शेख यांचे वडील, जिशान, रेहान व निहाल शेख यांचे ते आजोबा होत.

त्यांची अंत्ययात्रा १८ मार्च रोजी सकाळी ८:३० वा. सिद्धिविनायक हनुमान मंदिर समोर, वॉर्ड नं.७, काळाराम मंदिर रोड, श्रीरामपूर येथील निवासस्थानापासून निघेल.

# क्रूरकर्मा औरंग्याची कबर हटवा

## विहिंप व बजरंग दलाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; 'छत्रपती संभाजी महाराजांच्या सन्मानार्थ बजरंग दल मैदानात' घोषणा

नगर – उझबेगी परकीय आक्रमक बाबर याचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर छत्रपती संभाजी महाराजनगर या शहरात आहे. वास्तविक, औरंग्या अहिल्यादेवीनगर येथे मेला व नंतर त्याचे प्रेत काढून ते छत्रपती संभाजीनगर येथे पुरले व त्याठिकाणी त्याची कबर करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजनगर या शहरातील हिंदू द्वेष्टा, क्रूरकर्मा औरंग्याची कबर हटविण्याच्या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले.



औरंग्याची कबर हटवा या मागणीचे निवेदन विहिंप व बजरंग दलाचेवतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे महाराष्ट्र –गोवा क्षेत्राचे संयोजक विवेक कुलकर्णी, माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे, जिल्हा मंत्री अनिल जोशी, जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, बजरंग दलाचे जिल्हा सहसंयोजक साहिल पवार, शहर मंत्री श्रीकांत नांदापूरकर, मिलिंद मोभारकर, मुकुल गंधे, नगर तालुका प्रखंड मंत्री विश्वास बेरड, देविदास मुदगल, दिनेश जोशी, भागवत कुरधने, गणेश कराळे, उत्कर्ष गीते, वीरेंद्र शिंदे, नाना मोरे, सचिन पळशीकर, योगेश राऊत, मनोहर भाकरे, दिनेश हिरगुडे, दिनेश दातरंगे, सत्यम गुजर, ऋषी जुम्मीवाले, वारणोक आदींसह विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

अश्या क्रूरकर्मा व आततायी औरंगजेबाचे कुठलेही स्मारक अथवा कबर ही पुर्णपणे स्वतंत्र भारत देशात गुलामीचेच, अनंत यातनांचे प्रतिक आहे. आम्ही सर्व आपणांस विनंती करतो की, आपण ही कबर पूर्णपणे नष्ट करावी. परकीयांचे कुठलेही नामोनिशाण हे नष्ट झाले पाहिजे. आपण योग्य पद्धतीने ही कबर पुर्णपणे काढून टाकावी व हे न झाल्यास पूर्वसुचित करून विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हिंदू समाजाबरोबर छत्रपती संभाजीनगरकडे कार सेवेसाठी कूच करतील व औरंग्याची कबर उद्ध्वस्त करतील, असा इशारा बजरंग दलाचेवतीने देण्यात आला आहे.

## सिगारेट पाकीट उधार न दिल्याच्या रागातून किराणा दुकान पेटविले; लाखोंचे नुकसान

नगर – किराणा दुकानदाराने सिगारेटचे पाकीट उधार दिले नाही याचा राग आल्याने एकाने दुकानाचे शटर उघडून आत पेट्रोल टाकून किराणा दुकान पेटवून दिले. या घटनेत दुकानातील किराणा सामान व फर्निचर जळून सुमारे सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान झाले. ही घटना नगर तालुक्याचे नांदगाव येथे १५ मार्च रोजी घडली.

याबाबत किराणा दुकानदार शिवाजी भगवान सोनवणे (रा. नांदगाव ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांचे नांदगाव येथे शनेश्वर किराणा नावाचे दुकान आहे. त्या दुकानात विजय दादासाहेब जाधव (रा. नांदगाव ता.नगर) हा आला व त्याने सोनवणे यांना सिगारेटचे पाकीट उधार मागितले. परंतु सोनवणे यांनी त्यास सिगारेटचे पाकीट उधार दिले नाही. याचा राग आल्याने विजय जाधव यांनी सोनवणे यांच्या दुकानाचे शटर कशानेतरी उचकाटून उघड्या शटर वाटे आत पेट्रोल टाकून दुकान पेटवून दिले. या आगीत दुकानातील किराणा माल व फर्निचर जळून सुमारे सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. असे फिर्यादीमध्ये म्हटले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी शिवाजी सोनवणे यांनी दिलेला फिर्यादीवरून विजय जाधव यांच्याविरुद्ध गुन्ह्याची नोंद केली. पुढील कारवाई एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## हातगाडी चालकावर कोयत्याने वार

नगर – हातगाडी चालकाने सुट्टे पैसे दिले नाही याचा राग आल्याने चौघांनी हातगाडी चालकास शिवीगाळ, दमदाटी करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन, कोयत्याने हातावर वार करून गंभीर जखमी केले. ही घटना नगर एमआयडीसी येथील क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंपनी समोर १६ मार्च रोजी घडली.

याबाबत प्रथमेश डेविड पवार (रा. चक्रधर स्वामी मंदिर मागे, नागापूर, एमआयडीसी, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की प्रथमेश आणि त्याचे वडील डेव्हिड पवार हे त्यांच्या चिकन टिक्का या गाडीवर असताना त्याचे गाडीवर मनोज साळुंखे (रा. गणेश चौक, नागापूर) हा त्याच्या अन्य तीन साथीदारासह चिकन टिक्का खाण्यासाठी आला. चिकन टिक्का खाल्ल्यानंतर त्यांच्याकडे बिलाची मागणी केली असता त्यांनी पन्नास रुपयांच्या बिला करिता पाचशे रुपये हातगाडी चालकाला दिले. यावर हातगाडी चालक पवार त्यांना म्हणाले की सुट्टी पैसे आमच्याकडे नाहीत. असे म्हटल्याचा मनोज साळुंखे व इतरांना राग आल्याने त्यांनी त्यांना शिवीगाळ केली व सुट्ट्या पैशाकरिता लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मनोज साळुंखे यांनी त्याच्या हातातील कोयता डेव्हिड पवार यांच्या हातावर मारला. पवार हे जखमी झाले. त्यावेळी अन्य तिघांनी त्यांना शिवीगाळ केली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात प्रथमेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चव्हाण विरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली अधिक तपास पोलीस हवालदार साबीर शेख करीत आहे.

### सरकारी कर्मचारी संघटनेचे
## श्रीकांत उर्फ बंडा शिर्शिकर यांचे निधन

नगर – राज्य कर्मचारी संघटनेचे खजिनदार श्रीकांत तथा बंडा प्रभाकर शिर्शिकर (वय ७१) यांचे प्रदीर्घ आजाराने १४ मार्च रोजी निधन झाले. इरीगेशन विभागाचे ते सेवानिवृत्त कर्मचारी होते. राज्य कर्मचारी संघटनेचे कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी वेळोवेळी आंदोलने, मोर्चे, धरणे यांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग होता. संघटनेचे सरचिटणीस कै. योगीराज खोंडे यांचे ते अतिशय निकटचे आणि विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जात. अनेक वर्षापासून ते अगदी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी संघटनेच्या खजिनदार पदाची धूरा सांभाळली. शासकीय कर्मचाऱ्यांच्या रास्त आणि हक्काच्या मागण्यांसाठी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत झटणारा एक सच्चा कार्यकर्ता, अशी त्यांची ओळख होती. १५ मार्च रोजी नालेगाव अमरधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात, एक भाऊ, बहिण असा परिवार आहे.



## विठ्ठलराव राऊत यांचे निधन

नगर – जिल्हा वारकरी सेवा संघाचे सदस्य व अभ्यासक विठ्ठलराव बाबुराव राऊत (वय ७३) यांचे १३ मार्चला आकस्मिक निधन झाले. त्यांच्यामागे एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. नगरच्या अ. नगर जिल्हा वारकरी सेवा संघाचे अध्यक्ष ह भ प विश्वनाथ अण्णा राऊत यांचे ते लहान बंधू होते.



## मधुकर सोनवणे यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील खंडाळा येथील जि.प. प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकर बाबुराव सोनवणे (वय ७४) यांचे १६ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. डॉ.आनंदकुमार सोनवणे यांचे वडील होत.





## हनुमान चालिसा पाठ

मंगळवार दि. १८/०३/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**सप्तश्रृंगी सामाजिक सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ,** प्रोफेसर चौक, समर्थ शाळे समोर, पंकज राठोड–९८५०४२७८८८

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**शैलेश मुनोत (वर्धमान प्लायवूड),** सगम हॉटेलसमोर, स्टेशन रोड, राज मुनोत, मो. ८८६३०५०५०५

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**श्री रोकडेश्वर हनुमान मंदिर,** राजू पगारे एवम पंकज भुतारे, रोकडेश्वर हनुमान मंदिर, जॉगिंग पार्कच्या जवळ, भिंगार.

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**श्री धर्मवीर जगदीश भोसले मित्रमंजडळ,** सौरभ न्हावरे, आडते बाजार, अहिल्यानगर.

## दोन दारू अड्ड्यावर कारवाई

नगर – बेकायदेशीर दारु विक्री करणाऱ्या दारु अड्ड्यावर नगर तालुका पोलिसांनी छापा टाकून १० हजार ५६० रुपये किमतीची दारू जप्त केली. नगर तालुक्यातील वाळुंज आणि सारोळाबद्दी शिवारात १६ मार्च रोजी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत वाळुंज येथे दारू विक्री करणाऱ्या उद्धव सोपान मोरे (वय ४९) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे १० हजार रुपये किमतीची १०० लिटर गावठी दारू जप्त केली. दुसऱ्या कारवाईत सारोळाबद्दी शिवारातील हॉटेल एल आर जवळ असलेल्या दारू अड्ड्यावर छापा टाकून कुंदन भास्कर जाधव (वय ३८, रा. सावता नगर, सारोळा बद्दी) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील ५६० रुपये किमतीची देशी बॉबी, संत्रा दारू जप्त केली. पुढील कारवाई नगर तालुका पोलीस करीत आहे.

## रस्ते व फुटपाथवरील अतिक्रमणांवर कारवाईसाठी महानगरपालिका शहरात पुन्हा राबवणार मोहीम

*(पान १ वरुन)*

अतिक्रमण निर्मूलन विभागाला मोहीम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित वाहन मालक व रस्ते, फुटपाथवरील अनधिकृत विक्रेत्यांनी तत्काळ अतिक्रमणे हटवून रस्ते मोकळे करावेत, अन्यथा गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.





शहरातील रहदारीस अडथळा होणारी अतिक्रमणे व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महानगरपालिका सातत्याने आढावा घेऊन उपाययोजना करत आहे. नुकत्याच झालेल्या बैठकीत रस्त्यालगत लावण्यात आलेल्या जुन्या व बंद अवस्थेतील वाहने, फुटपाथवर होणारे अनधिकृत व्यवसाय यावर चर्चा झाली. मिस्किन मळा रोड, जुने कोर्ट रोड, स्वामी विवेकानंद चौक, लालटाकी अप्पू चौक ते सर्जेपुरा, साईनगर, भोसले आखाडा, कोठला, नवीपेठ, तोफखाना व मध्य शहरात प्रमुख रस्त्यांवर जुनी व बंद अवस्थेतील वाहने लावल्याची व त्यामुळे रहदारीस अडथळा होत असल्याचे, अस्वच्छता होत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. सदर वाहने तत्काळ काढून घ्यावीत. अन्यथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २३० व २३१ अंतर्गत सदर वाहने बेवारस समजून ती तत्काळ जप्त करावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच, दिल्लीगेट ते चितळे रोड हा रहदारीचा रस्ता असून, या ठिकाणी रस्त्यावर व्यवसाय थाटणाऱ्या विक्रेत्यांची संख्या वाढली आहे. या विक्रेत्यांनी आपले अनधिकृत व्यवसाय त्वरित हटवावेत, अन्यथा त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

नागरिकांनी रस्त्यावर रहदारीला अडथळा होईल, अशा पद्धतीने वाहने लावू नयेत, रस्त्यावर व फुटपाथवर व्यवसाय थाटून रहदारीला अडथळा निर्माण करू नये, अन्यथा संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे यशवंत डांगे यांनी सांगितले आहे.

## विवाहीत महिलेला धमकावत बळजबरीने अपहरण करून अत्याचार; गुन्हा दाखल

### ग्रामस्थांनी गाव बंद ठेवत केला घटनेचा निषेध

नगर – नगर तालुक्यातील देहरे गावातून एका २९ वर्षीय विवाहित महिलेला धमकावत तिचे बळजबरीने अपहरण करत तिच्यावर नगर मनमाड महामार्गावरील एका हॉटेल मध्ये अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. त्यानंतर त्या महिलेला अकोले येथे नेवून तिच्या जवळील पैसे दागिने घेवून तिला बस स्थानकावर सोडून देण्यात आले. या प्रकरणी तन्वीर शेख, सोहेल शेख व अल्फेज शेख (सर्व रा. देहरे, ता.नगर) यांच्या विरुद्ध नगरच्या एमआयडीसी पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर विवाहित महिला १४ मार्च रोजी संध्याकाळी मुलासाठी जत्रेमधून खेळणी विकत आणते, असे सांगत घरातून बाहेर पडली आणि गायब झाली. रात्री उशिरापर्यंत महिला न आल्याने तिचा शोध सुरू करण्यात आला व एमआयडीसी पोलीस ठाण्यात तशी तक्रार देण्यात आली. या महिलेस एका विशिष्ट समाजाच्या मुलांसोबत जाताना काहींनी पाहिले. त्यानुसार लोकांनी शोध सुरू केला असता जवळीलच गावातील हॉटेलमध्ये ते मुक्कामास असल्याचे गावातील लोकांच्या निदर्शनास आले.

हा लव जिहादचा प्रकार असल्याने गावातील वातावरण तापले. १५ मार्चला गावात ग्रामसभा घेण्यात आली. गावातील अतिक्रमणे काढण्याबरोबरच गावात काही नवीन विशिष्ट समाजाच्या लोकांची संख्या काही दिवसात वाढत असून अनेक बाहेरचे लोक या ठिकाणी स्थायिक झाल्याचे गावकरी सांगतात. हे लोक कोठून आले, त्याचे आधार कार्ड, त्यांचे मूळ ठिकाण शोधण्यात यावे व या लोकांना गावातून बाहेर काढण्यात यावे, गावातील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत, असे ठराव करण्यात आले.

हिंदुत्ववादी संघटनांना ही माहिती मिळताच त्या संघटनांचे पदाधिकारी गावात दाखल झाले. १६ मार्च रोजी गावात बंदची हाक देण्यात आली. दरम्यान आ. संग्राम जगताप, पारनेरचे आ. काशिनाथ दाते यांनी या ठिकाणी भेट दिली. ज्या कुटुंबातील महिला होती त्या पीडित कुटुंबातील लोकांना पोलिस संरक्षण मिळावे, तसेच गावातील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत, यासाठी आपणही प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान बेपत्ता महिलेचा शोध घेण्यास एमआयडीसी पोलिसांना १६ मार्चला दुपारी यश आले यश आले. अकोले येथून महिलेला ताब्यात घेतले. अकोले पोलिसांच्या मदतीने एमआयडीसी पोलिसांनी महिलेचा शोध घेतला. त्यानंतर रात्री उशिरा पीडित महिलेने फिर्याद दिली. गावातील तन्वीर शेख, सोहेल शेख व अल्फेज शेख यांनी मला व माझ्या मुलाला जीवे मारण्याची तसेच माझी गावात बदनामी करण्याची धमकी देत मला बळजबरीने फोन करून बोलावून घेतले व वाहनात बसवून नेले. नांदगाव शिवारात असलेल्या एका हॉटेल मध्ये तन्वीर शेख याने मला पुन्हा धमकी देत अत्याचार केला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी नगर तेथून बेलापूर, संगमनेर, भंडारदरा असे फिरवले. १६ मार्चला अकोले येथील बसस्थानकावर माझ्याकडील पैसे व दागिने घेवून मला सोडून दिले. त्यानंतर आपण एका महिलेच्या मोबाईल वरून कुटुंबियांना फोन केल्यावर त्या ठिकाणी पोलिस आले व त्यांनी मला एमआयडीसी पोलिस ठाण्यात आणल्याचे या महिलेने फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून तन्वीर शेख, सोहेल शेख व अल्फेज शेख यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील तपोवन रोडवर रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

## रात्री संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना तपोवन रोडवर पकडले

नगर – मध्यरात्रीच्या सुमारास काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने थांबलेल्या दोघांना तोफखाना पोलिसांनी सावेडी परिसरातील तपोवन रोडवरील बारा एकर येथील निलगिरीच्या झाडाच्या आडोशाला १७ मार्च रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास पकडले आहे. अभिषेक किशोर गायकवाड (वय २३, रा. उक्कलगाव, ता.श्रीरामपूर), रोशन बाळू मांजरे (वय १८, रा. पिंपरी, ता. निफाड, जि. नाशिक) अशी त्यांची नावे आहेत.

तोफखाना पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार सौरभ त्रिमुखे सोबत होमगार्ड सुरज लोटके, निलेश चक्रनारायण असे सावेडी परिसरात रात्री गस्त करीत असताना त्यांना पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास तपोवन रोडवरील १२ एकर येथील एका निलगिरीच्या झाडाच्या आडोशाला दोन तरुण होंडा शाईन गाडी (क्र. एम एच १७ डी एफ ४०४९) सह मिळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्यामुळे त्यांना पोलिसांनी गाडीसह तोफखाना पोलीस ठाण्यात आणले. तिथे त्यांची चौकशी केली असता समाधानकारक उत्तर दिली नाहीत. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी पो. कॉ. सौरभ त्रिमुखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अभिषेक गायकवाड व रोशन मांजरे यांच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ ची कलम १२२, १२४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मॅककेअर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा हे नगरकरांचे भाग्य

**डॉ. सुशील पाटकर यांचे प्रतिपादन**



अहिल्यानगरच्या मॅककेअर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये मेंदूतील रक्तवाहिन्या, मज्जारज्जू तसेच ट्यूमरसारख्या शस्त्रक्रिया करण्यासाठी रोबोटिक आर्टिफिशयल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याचे उद्‌घाटन करताना पूना हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. सुशील पाटकर व डॉ. सुजय विखे पाटील. समवेत डॉ. व्यंकटेश यादव, डॉ. सौ. काशीद, डॉ. मरियम माजीद, डॉ. पियुष पाटील, डॉ. मोहम्मद माजीद, डॉ. सौ. पाटकर, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. निलेश परजणे, डॉ. अमोल गव्हाणे आदी.

## मेंदूवरील शस्त्रक्रियेचे रोबोटिकच्या सहाय्याने उद्‌घाटन

नगर – चांगला न्यूरोसर्जन होण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात. खूप वेळ द्यावा लागतो. सीटी स्कॅनचा शोध लागण्याअगोदर पासून मी मेंदूतील ट्यूमरच्या शस्त्रक्रिया करत होतो. त्यावेळी अनेकदा शस्त्रक्रिया अयशस्वी होत होत्या. आता आधुनिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रिया यशस्वी होण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. भारतात मोजक्या ठिकाणीच आधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साह्याने अशा प्रकारच्या मेंदूवरील शस्त्रक्रिया केल्या जातात. देशातील नामांकित बेंगळूरु सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल मधून शिक्षण घेतलेल्या डॉ. मोहम्मद माजीद यांच्याकडून रोबोटिक आर्टिफिशयल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून आता अहिल्यानगर मध्ये ही सेवा मिळणार हे नगरकरांचे भाग्य असल्याचे प्रतिपादन पूना हॉस्पिटल येथील न्यूरोसर्जन डॉ.सुशील पाटकर यांनी व्यक्त केले.

मेंदूतील रक्तवाहिन्या, मज्जारज्जू तसेच ट्यूमरसारख्या अतिशय अवघड शस्त्रक्रिया रोबोटिक आर्टिफिशयल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून अहिल्यानगरच्या मॅककेअर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात येणार आहेत. या उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. डॉ. माजीद यांच्या माध्यमातून जागतिक पातळीवरील अतिप्रगत अशा हाय एंड मायक्रोस्कोप सिस्टीम (ZEISS TIVATO 700) न्यूरोसर्जरीच्या क्षेत्रातील रुग्णांसाठी एक प्रकारे वरदान ठरणार आहे. यावेळी सांधेविकार तज्ञ डॉ. प्रशांत पटारे, किडनी रोग व मूत्ररोग तज्ञ डॉ. आनंद काशीद, हृदयरोग तज्ञ डॉ. सुदाम जरे, मधुमेह तज्ञ डॉ. अभिजीत शिंदे, डॉ. पियुष पाटील, श्वसन रोग तज्ञ डॉ. निलेश परजणे, सोनोग्राफी तज्ञ डॉ. श्रीकांत गव्हाणे, उद्योजक रोहन मांडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, डॉ. पाटकर यांनी संगितले की मी तुमचा विद्यार्थी आहे, हे आता सिद्ध झाले की, मी खरोखर न्यूरोसर्जन आहे. यानिमित्ताने नगरकरांनाही समजले की माझी न्यूरोसर्जनची डिग्री खरोखर आहे. रुग्णांना चांगले वैद्यकीय सल्ले दिले पण लोकांनी उलटा अर्थ घेतला. त्यामुळे मी वैद्यकीय व्यवसाय सोडून राजकारणातला डॉक्टर होण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीत माझा पराभव झाला. गोरगरिबांच्या आशीर्वादमुळे व रुग्णसेवेमुळे मी तीन महिन्यात पुन्हा उभा राहिलो. परत वैद्यकीय व्यवसायात जाण्याचा विचार करतोय. रुग्णाला निःशुल्क बरे करण्याचे पुण्य मिळवणार आहे. जाहिराती पेक्षा कृतीला महत्व असते हे येणाऱ्या काळात दिसून येईल असेही ते म्हणाले.

प्रारंभी प्रास्ताविकात डॉ. माजिद यांनी सांगितले की मागील बारा वर्षांपासून मेंदू वरील शस्त्रक्रिया करताना लोकांच्या मनातील शंका दूर केल्या. आता नवीन तंत्रज्ञानामुळे रुग्णांना अधिकाधिक उत्तम सेवा देता येईल असे सांगितले. कॅन्सर तज्ञ व मॅककेअर हॉस्पिटलचे संचालक डॉ. सतीश सोनवणे यांनी आभार मानले.

### कॅन्सर रुग्णांनाही याचा फायदा होणार

कॅन्सरच्या शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या पुनर्बांधणी शस्त्रक्रियेसाठी सुद्धा या नवीन रोबोटिक तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. त्यामुळे कॅन्सरच्या रुग्णांनाही हे नवीन तंत्रज्ञान वरदान ठरणार असल्याचे कॅन्सर तज्ञ डॉक्टर सतीश सोनवणे यांनी सांगितले.

### राज्यातील पाचच ठिकाणी ही सुविधा उपलब्ध

मेंदूमधील ट्यूमरच्या शस्त्रक्रियेवेळी मेंदूच्या भागाला विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन दिले जाते. यानंतर ट्यूमरमुळे बाधित झालेला भाग पिवळसर हिरवा (Yellow 560 TIVATO) होतो. रोबोटिक आर्टिफिशल इंटेलिजन्स मशीनच्या दुर्बिणीद्वरे रंग बदलेला पिवळसर हिरवा खराब भाग स्पष्टपणे दिसतो. त्यामुळे मेंदूच्या भागाला धक्का न लावता अधिक सोप्या पद्धतीने, कमी वेळेत व अचूकरित्या ट्यूमरची शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी केली जाते. राज्यात चार ते पाच ठिकाणी अशा प्रकारची शस्त्रक्रिया केली जाते. त्यात आता अहिल्यानगरमधील मॅककेअर सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये अशा प्रकारची शस्त्रक्रिया केली जाणार असल्यामुळे राज्यभरातील रुग्ण या ठिकाणी शस्त्रक्रियेसाठी येणार आहेत. बसविण्यात आलेल्या रोबोटिक आर्टिफिशयल इंटेलिजन्स तंत्रज्ञानामुळे ट्यूमर, रक्तवाहिन्यामधील फुगा, मज्जारज्जू तसेच मेंदूच्या अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या जाणार आहेत.

### या उपचारासाठीही होणार फायदा

मेंदूतील रक्तवाहिनी बंद झाल्यामुळे पॅरॅलिसिस सारखा आजार होतो. ब्रेन अँजिओग्राफी करून कवटीच्या बाहेरील रक्तवाहिनी मेंदूच्या आतील रक्तवाहिनीला (brain bypass surgery) जोडून मेंदूला रक्तपुरवठा केला जातो. आणि जोडलेली रक्तवाहिनी सुरू आहे यासाठी आपण ऑपरेशन करतानाच मेंदूची (ZEISS INFRARED 800 Angiography) केली जाते. यामुळे शस्त्रक्रिया यशस्वी होते. वैद्यकीय क्षेत्रातील तंत्र प्रणालीद्वारे यशस्वीरित्या शस्त्रक्रिया केली जाते.



पुणे डिव्हिजन टाऊन प्लॅनिंग अशिष्टांट महाराष्ट्र शासन क्लास–२ पदी रँक १५ मिळवून मयूर राजेंद्र आगरकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा नंदनवन उद्योग समूहाच्या वतीने शिवसेना विधान सभा प्रमुख दत्ता जाधव यांचा हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक प्रशांत गायकवाड, संजय जाधव, देवन्द्र आगरकर, राजेंद्र आगरकर, ओंकार शेळके, राज जाधव, अशोक आगरकर, ओंकार आगरकर, प्रशांत गायकवाड, प्रदीप आगरकर, संकेत आगरकर आदींसह उपस्थित होते.

# शालेय स्तरावर झालेल्या विविध स्पर्धेत समृद्धी नजान हिने मिळविले पारितोषिके




अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलची इयत्ता ३ री मधील विद्यार्थीनी कु. समृद्धी सोमनाथ नजान हिने शालेय स्तरावर झालेल्या विविध स्पर्धेमध्ये चार पारितोषिके प्राप्त केली.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूल अहिल्यानगरची इयत्ता ३ री मधील विद्यार्थीनी कु. समृद्धी सोमनाथ नजान हिने शालेय स्तरावर झालेल्या विविध स्पर्धेमध्ये चार पारितोषिके प्राप्त केले. शाळेचा शेष पारितोषिक वितरण समारंभ नुकताच झाला. यामध्ये कु. समृद्धी हिला इंग्रजी कथाकथन स्पर्धा प्रथम क्रमांक, मराठी कथाकथन स्पर्धा द्वितीय क्रमांक, मिठाई बनवणे स्पर्धा द्वितीय क्रमांक, विज्ञान प्रदर्शन स्पर्धा तृतीय क्रमांक, कार्यक्रमासाठी उपस्थित असणारे प्रमुख पाहुणे क्रीडा अधिकारी आकाश थोरात यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी उपप्राचार्या कविता सुरतवाला, शिक्षिका आदिती कोकाटे उपस्थित होत्या.

शाळेतील विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये कु. समृद्धी हिने हे यश संपादन केले. समृद्धीने ज्या स्पर्धमध्ये सहभाग नोंदवला त्यामध्ये तिला यश प्राप्त झाले. समृद्धीला वर्गशिक्षिका अर्चना जाधव व विविध विषय अध्यापिका, स्पर्धा प्रमुख यांचे मार्गदर्शन लाभले. आई सुरेखा सोमनाथ नजान नेहमी तिला प्रोत्साहन देत असते.

यशाबद्दल अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य प्रभाकर भाबड, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे प्राचार्य उल्हास दुगड, रुपीबाई बोरा उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ, श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मनियार, गीता परिवार दक्षिण अहमदनगरच्या अध्यक्षा सौ. सुनंदाताई सोमाणी, समृद्धीचे आजोबा शिवाजीराव कजबे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगर येथे २१ मार्च रोजी पंडित दीनदयाल रोजगार मेळाव्याचे आयोजन

नगर – जिल्हयातील उमेदवारांना विविध क्षेत्रात नव्याने निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने २१ मार्च रोजी सकाळी १० वाजता एन.एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर येथे पंडीत दीनदयाल रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छूकांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून रोजगाराच्या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त निशांत सुर्यवंशी यांनी केले आहे.

मेळाव्यासाठी जिल्हयातील २० ते २५ नामांकित कंपन्यांचे उद्योजक सहभागी होऊन प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे उमेदवारांची निवड करणार आहेत. एचएचसी, सर्व शाखेतील पदवीधर, आयटीआय वैद्यकिय (नर्सिंग), इलेक्ट्रीकल, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, कंप्युटर आदी क्षेत्रामध्ये डिप्लोमा, डिग्री झालेल्या उमेदवारांनी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवर तसेच https://forms.gle/NXvisK3uX4R5J6G8 या लिंकवर आपली नाव नोंदणी करून पात्रतेनुसार उद्योजकांकडे अर्ज करावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयाचा दुरध्वनी क्र. ०२४१–२९९५७३५, रोजगार मेळावा समन्वयक वसीमखान पठाण ९४०९५५५४६५, मच्छिंद्र उकिरडे ९५९५ ७२२४२४, संतोष वाघ ८८३०२१३९७६, बद्रिनाथ आव्हाड ९४२०७२५२८०, योगेश झांजे ९५८८४०८८९० यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# समाजापुढे मानवी तस्करी गंभीर प्रश्न

**सत्र न्यायाधीश अंजु शेंडे यांचे प्रतिपादन; जिल्हा न्यायालयात मानवी तस्करी, वेठ बिगार निर्मूलन कायदा प्रशिक्षण व प्रक्रिया कार्यशाळा उत्साहात**



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी तस्करी, वेठ बिगार निर्मूलन कायदा प्रशिक्षण व प्रक्रिया या एकदिवशीय कार्यक्रम जिल्हा सत्र न्यायालयात पार पडले.

नगर – भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्ष होवून देखील आज ही अनेक ठिकाणी गरीब माणसाना प्राण्यासारखी वागणूक दिली जात आहे. मानवी हक्काची जपवणुक होण्यासाठी त्यांना त्यांच्या अधिकाराची माहिती व्हायला हवी. समाजापुढे मानवी तस्करी गंभीर प्रश्न निर्माण होत असताना नागरिकांमध्ये जागृती आवश्यक आहे. मानवी तस्करी, वेठबिगारी कमी करण्यासाठी अनेक संस्था पुढे येवून काम करत आहे. अमृवाहिनी या संस्थेने मागील काही वर्षात वेठबिगार निर्मूलनासाठी केलेले काम कौतुकास्पद आहेच आणि गरजेचे देखील असल्याचे प्रतिपादन जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी तस्करी, वेठ बिगार निर्मूलन कायदा प्रशिक्षण व प्रक्रिया या एकदिवशीय कार्यक्रम जिल्हा सत्र न्यायालयात पार पडले. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश शेंडे बोलत होत्या.

जिल्हा विधी प्राधिकरणच्या सचिव तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, श्री अमृतवाहीनी ग्रामविकास मंडळ तर्फे वेळोवेळी मानवी तस्करी रोखणे व वेठबिगारी मुक्ततेसाठी प्रयत्न केले जाते, ही खूप मोठी सामाजिक चळवळ आहे. वेठबिगारी निर्मूलन व मानवी तस्करी कायदा व प्रक्रिया ही एकदिवशीय कार्यशाळेमुळे जनजागृती तर होईलच तसेच कायद्यातील कलम, पुनर्वसन प्रक्रिया, शासनाकडून मिळणारे आर्थिक मदत, अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी या कार्यशाळेमुळे पॅनल वकील व अधिकार मित्र यांना नव्याने शिकायला मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सिराज शेख यांनी अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ ही संस्था मागील दोन दशकापासून सामाजिक काम करत आहे, रस्त्यावरील बेवारस मनोरुग्ण, अनाथ, निराधार, वंचित, महिला, पुरुष व बालकांकरिता अहोरात्र परिश्रम घेत आहे. हे सामाजिक काम करत असताना मागील दोन वर्षापासून वेठबिगाराचे प्रमाण वाढत असल्याचे संस्थेच्या संचालक मंडळाच्या लक्षात आले, तेव्हा संस्थेमार्फत वेगवेगळ्या शाळा, कॉलेज, शासकीय यंत्रणा, पोलिस प्रशासन व ग्रामपंचायत आदी स्तरावर वेठबिगार कार्यक्रमाचे नियोजन करून जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात मानवी तस्करी प्रक्रियेवर पॅनल वकील व अधिकार मित्र (पीएलव्ही) यांना वेठबिगार निर्मूलन कायदा १९७६ व मानवी तस्करी, बालमजुरी, बालविवाह यासारख्या कायद्यांवर मार्गदर्शन करुन प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी ॲड. तृप्ती पाटील (डीएलएसए पॅनल लॉयर ठाणे स्पेशल सेल), गोरख जाधव (सिनियर असोसिएट, इंटरनॅशनल जस्टिस मिश, मुंबई) व अमृतवाहिनी संस्थेचे सदस्य अंबादास गुंजाळ यांची उपस्थित होती.

या कार्यक्रमाप्रसंगी विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. सागर पादीर, ॲड. संदीप वांढेकर, ॲड. रावसाहेब बर्डे, ॲड. वृषाली तांदळे, ॲड. भक्ती शिरसाठ, ॲड. बेबी कोरडे, ॲड. मनीषा पंढरी, ॲड. अरुणा राशिनकर, ॲड. निशिता देशमुख, ॲड. आशा गोंधळे, अधिकार मित्र (पीएलव्ही) प्रभाकर धिरडे, किशोर धोटे, तनिज शेख, शोभा गाडे आदी उपस्थित होते.

संस्थेचे सचिव दिलीप गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिराज शेख, आंबादास गुंजाळ, मंगेश थोरात, संध्या कुलकर्णी, मयूरी वनवे, राहुल साबळे आदींनी परिश्रम घेतले. शिवानी शिंगवी यांनी सूत्रसंचालन केले. संध्या कुलकर्णी यांनी आभार मानले.

# 'राष्ट्रीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत' सलग पाचव्यांदा नगर येथील डॉ.शरद मगर यांना सुवर्ण पदक




नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे (स्वायत्त) शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बाळासाहेब मगर यांनी राष्ट्रीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत सलग पाचव्यांदा सुवर्ण पदक पटकाविले.

बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय स्टेडियम, राउरकेला (ओडिसा) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय मास्टर्स वेट लिफ्टिंग स्पर्धेत डॉ. मगर यांनी उत्कृष्ट कामगिरी करुन सुवर्ण पदकाची कामगिरी करत महाराष्ट्राला सुवर्ण पदक मिळवून दिले. ७९ वजन गटात ११६ किलो वजन त्यांनी उचलले. मगर यांनी या अगोदर गुजरात, बडोदा, केरळ, तिरुअनंत पुरम, वाराणसी, गोवा येथे झालेल्या मास्टर्स गेम्स वेट लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण पदकाची कामगिरी केली होती.

डॉ. मगर हे नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई या खेडेगावातील रहिवाशी असून, ते सध्या न्यू आर्टस् महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत असताना या खेळात अनेक खेळाडू घडवीत आहे. त्यांनी महाविद्यालतील खेळाडूंना वेट लिफ्टिंग या खेळ प्रकारात प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय पातळीवर नेले आहे. त्यांनी घडविलेल्या खेळाडूंनी देखील राष्ट्रीय पातळीवर शहराचे नाव उंचावले आहे. खेळाडूंबरोबर ते सुद्धा वेट लिफ्टिंग खेळाचा सराव करत मास्टर्स गेम्स स्पर्धेत भाग घेऊन नवा आदर्श निर्माण केला आहे. डॉ. मगर हे त्यांच्या महाविद्यालयिन दशेत देखील पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय खेळाडू होते. आज देखील ते महाविद्यालयातील खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी वेट लिफ्टिंगचा सराव करत आहेत.

त्यांनी शारीरिक शिक्षिण या विषयांची शारीरिक शिक्षण व खेळ आणि वेट ट्रैनिंग हे दोन पुस्तके देखील प्रकाशित केले आहेत. तसेच ते शारीरिक शिक्षण या विषयाचे पीएच.डी.मार्गदर्शक देखील आहेत. वयाच्या ५३ व्या वर्षी देखील राष्ट्रीय स्तरावरील वेट लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग घेऊन सुवर्णपदक मिळवणारे डॉ. मगर विद्यार्थी, खेळाडू व समाजासाठी संदेश देतात की, अगर उम्र को हराना है तो शौक जिंदा रखिए!

या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे पाटील, जी.डी. खानदेशे, मुकेश मुळे व सर्व विश्वस्त व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, समन्वयक डॉ.बी. एच. झावरे, उपप्राचार्य डॉ.संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे, डॉ. किसन अंबाडे, प्रबंधक बबन साबळे, कार्यालय अधिक्षक राजू पाटील, जगन्नाथ सावळे सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षेतर कर्मचारी, जिमखाना विभागातील प्रा. धन्यकुमार हराळ, प्रा. धनंजय लाटे, प्रा. सुधाकर सुंबे, आकाश नढे, तुषार चौरे यांनी डॉ. मगर यांचे अभिनंदन केले.

# मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर आझाद मैदानावरील आंदोलन स्थगित

**ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा न देता ३४ हजार कोटीचा अपहार; भारत ब्रॉडबँड कंपनी, केंद्र व राज्य सरकार विरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणार**




भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड कंपनीने राज्यातील ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा देण्याच्या नावाखाली ३४ हजार कोटी रुपयांचा अपहार केला असल्याच्या आरोपावर आधारित सरपंच परिषदेचे मुंबई येथील आझाद मैदानावर सुरु असलेले उपोषण.

नगर – भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड कंपनीने राज्यातील ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा देण्याच्या नावाखाली ३४ हजार कोटी रुपयांचा अपहार केला असल्याच्या आरोपावर आधारित सरपंच परिषदेचे मुंबई येथील आझाद मैदानावर सुरु असलेले उपोषण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. सरपंच परिषदेचे पुणे जिल्हा समन्वयक कुंडलिक कोहिनकर यांच्या पुढाकाराने सुरु असलेले उपोषण पाचव्या दिवशी मागे घेण्यात आले. सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, प्रदेश उपाध्यक्ष विकास जाधव, राज्य कोर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे यांच्या हस्ते उपोषणकर्ते कोहिनकर यांना लिंबू पाणी देऊन उपोषण स्थगित केले.

उपोषणकर्ते कोहिनकर यांच्यासह सरपंच परिषदेच्या राज्याच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री यांचे मुख्य सचिव अमोल पाटणकर यांची भेट घेतली. भारत ब्रॉडबँड कंपनीची चौकशी करून राज्यातील सर्व ग्रामपंचायत यांना सक्षमपणे ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल. यानंतर मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव, ग्राम विकास खात्याचे मुख्य सचिव, माहिती व तंत्रज्ञान खात्याचे मुख्य सचिव यांची संयुक्त बैठक घेऊन यासंबंधी आढावा घेण्यात येईल आणि पंधरा दिवसानंतर सर्व खात्यांचे सचिव यांच्या बरोबर सरपंच परिषदेच्या राज्यातील पदाधिकारी यांच्यासोबत आढावा घेऊन यावर ठोसा असा सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्य सचिव पाटणकर यांनी दिले.

शासनाने नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क या योजनेद्वारे महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी १२ एप्रिल २०१३ रोजी ही योजना आणली. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला आहे. परंतु या कंपनीने कराराचा भंग केला आहे कोणत्याही प्रकारची इंटरनेट सुविधा राज्यातील ग्रामपंचायतींना न देता बोगसपणे खर्च करून ३४ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप सरपंच परिषदेच्या वतीने करण्यात आला आहे. राज्यातील कोणत्याही ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड सुविधा उपलब्ध करून न देता, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व प्रसारण विभागाने खोटी आणि बोगस माहिती या संदर्भात दिली आहे. या योजनेत ३४ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होऊन जनतेच्या पैश्यांची लूट करण्यात आली आहे. शासनाने याबाबत ठोस भूमिका घेऊन सदर सुविधा राज्यातील ग्रामपंचायतींना पुरवली नाही. याबाबत सरपंच परिषद भारत ब्रॉडबँड नेटवर्क कंपनी, केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या विरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना न्याय देण्यास कटिबद्ध राहील, अशी माहिती राज्य कोर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे यांनी दिली.

सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव, राज्य सरचिटणीस राजू पोतनीस, राज्य कोर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे, राज्य प्रसिद्ध प्रमुख संजयबापू जगदाळे, राज्य कोर कमिटी उपाध्यक्ष जी.डी. टेमगिरे यांच्यासह सरपंच परिषदेचे अनेक राज्यातील पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते. सरपंच परिषदेने आमदार श्रीकांत भारती, आमदार सुरेश धस, आमदार कैलास पाटील यांच्यामार्फत या विषयासंदर्भात लक्ष वेधण्याचे काम केले. या आंदोलनासाठी खेड सरपंच परिषदेचे मनोहर पोखरकर, सरपंच चंद्रकांत भालेराव यांनी सहकार्य केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे हृदय बनले

## प्रेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; शिबिरात २६० रुग्णांची मोफत हृदय तपासणी



राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

नगर - आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे हृदय बनले आहे. महाराष्ट्रासह देशातील कानाकोपऱ्यातून हृदयासंबंधी असलेल्या विविध शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्ण येत आहेत. २००४ मध्ये सेवाभावाने सुरु झालेल्या या सेवेने सर्वसामान्यांच्या हृदयात घर करुन मोठा विश्वास संपादन केला आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत हृदयासंबंधी सर्व शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर सोशल हब म्हणून उदयास आले असल्याची भावना प्रेमराज बोथरा यांनी व्यक्त केली.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये मोफत हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी प्रेमराज बोथरा बोलत होते. बोथरा परिवारातील सदस्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनिषा बोथरा, संगिता बोथरा, प्रतिभा बोथरा, मंगलताई रुनवाल (विजापूर कर्नाटक), सीए आयपी अजय मुथा, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, अनिल मेहेर, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. गिरी, डॉ. गवळी, डॉ. पारधे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सीए आयपी अजय मुथा म्हणाले की, बोथरा परिवाराने उद्योग व सामाजिक क्षेत्रात नाव उंचावले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या निर्मितीपासून ते वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी उभारण्यासाठी या परिवाराचे महत्त्वाचे योगदान मिळत आहे. हॉस्पिटलच्या प्रगतीच्या विविध टप्प्यांवर या परिवाराने भक्कमपणे योगदान दिले आहे. फक्त आर्थिक हातभार न लावता, तन व मनाने ते सेवा देत असून, शहरातील विविध महत्त्वकांशी सामाजिक प्रकल्पात ही त्यांचे मोलाचे योगदान आहे. समर्पण भावनेने बोथरा परिवाराचे कार्य सुरू असून, त्यांची नवीन पिढी देखील या सेवा कार्यात योगदान देत आहे. वर्धमान महावीर युनिव्हर्सिटीसाठी त्यांची मोलाची साथ लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

सतीश बोथरा यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य सेवेसाठी सर्व तन, मन, धनाने योगदान देत आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. ही आरोग्यसेवा रुग्णांना आधार देणारी ठरत असून, ही सेवा महाराष्ट्राची शान बनली असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात २६० रुग्णांची मोफत हृदय तपासणी करण्यात आली. तर शिबिरात सहभागी गरजूंची ३ हजार रुपयात अँजिओग्राफी करण्यात आली. गरजेनुसार रुग्णांची बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी अल्पदरात केल्या जाणार आहेत. तर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत. पाहुण्यांचे स्वागत डॉ. आशिष भंडारी यांनी केले. अनिल मेहेर यांनी आभार मानले.

# लंडनमधील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी शहरातील युवा साहित्यिक स्वप्निल खामकर यांची निवड

## जगभरातील शास्त्रज्ञ, अभ्यासक, धोरणकर्ते आणि कायदेतज्ज्ञांचा असणार सहभाग



नगर - शहरातील युवा साहित्यिक स्वप्निल संजय खामकर यांची लंडनमधील ग्रेस इन येथे २४ व २५ एप्रिल रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड झाली आहे. ही परिषद महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, मुंबई विद्यापीठ आणि ग्रेस इन, यूके यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाते. या परिषदेत डॉ. आंबेडकर यांच्या कायद्याशी संबंधित योगदान, सामाजिक न्यायाची कल्पना आणि आर्थिक धोरणांवर चर्चा केली जाणार आहे. विशेषतः त्यांच्या लंडनमधील शिक्षणाचा प्रभाव या विषयावर भर दिला जाणार आहे. स्वप्निल खामकर यांच्या निवडीमुळे शहरासह महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या परिषदेत जगभरातील शास्त्रज्ञ, अभ्यासक, धोरणकर्ते आणि कायदेतज्ज्ञ सहभागी होणार आहेत. प्रमुख चर्चेचे विषय आंबेडकरांचे कायदेशीर योगदान, समावेशक विकास, सामाजिक न्याय चळवळी आणि आजच्या काळातील त्यांचे विचार किती लागू आहेत, यावर आधारित असणार आहेत.

या निवडीबद्दल खामकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय व समानतेच्या क्षेत्रात दिलेले योगदान अमूल्य आहे. ज्या ठिकाणी त्यांनी शिक्षण घेतले, तिथे जाऊन त्यांच्या विचारांवर चर्चा करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि जबाबदारीची बाब आहे. उद्योजकता विकास, युवक सशक्तीकरण आणि सामाजिक न्याय क्षेत्रात कार्यरत असलेल्या खामकर यांच्या सहभागातून चर्चा घडणार आहे.

स्वप्निल खामकर याने युवकांसाठी लिहिलेल्या झिरो टू लॉन्च आणि द सीईओ ऑफ द माईंड या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन नुकतेच उद्योग मंत्री उदय सामंत व शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले. तो २०१७ मध्ये इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षात असताना वास्को-द-गामा वर आधारित ८ द गेम इज ऑन हा पुस्तक लिहिणारा महाराष्ट्रातील अत्यंत कमी वयाचा दुसरा युवक ठरला होता. त्याने ट्रॅडिशनल पब्लिशर ओथरचा मान मिळवला असून, त्याचे लिखाण युवकांना स्फुर्ती देणारे ठरत आहे.

सदर परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रेस इन मधून बार-ट-लॉफ झाल्याच्या १०० वर्षांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केली आहे आणि त्यांच्या मानवाधिकार, लोकशाही, आणि आर्थिक समतेवरील जागतिक प्रभावाला अधोरेखित करते.

# ‘उर्दू स्कूल’च्या परवीन खान यांचा कर्तृत्ववान महिला पुरस्काराने गौरव



अहमदनगर उर्दू प्राथमिक स्कूलच्या शिक्षिका परवीन खान यांना कर्तृत्ववान महिला पुरस्काराने गौरविण्यात आले.

नगर - शहरातील नागोरी मुस्लिम मिसगर जमाअत ट्रस्ट संचलित अहमदनगर उर्दू प्राथमिक स्कूलच्या शिक्षिका परवीन फैसल खान यांना ठाणे येथील मातृसेवा फाउंडेशन आणि शिक्षक ध्येय यांच्यावतीने राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. खान यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

परवीन खान यांना नुकताच सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्यावतीने सचिव रेहान काझी व खजिनदार वाजिद खान यांनी त्यांचा सत्कार केला. विविध क्षेत्रातील महिलांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मातृसेवा फाउंडेशन व शिक्षक ध्येय यांच्यावतीने महिला दिनानिमित्त राज्यातील ३४ महिलांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

परवीन खान या अहमदनगर उर्दू प्राथमिक स्कूलमध्ये शिक्षिका असून, अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन प्रगतीसाठी त्या विविध शैक्षणिक उपक्रम राबवित असतात. पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांना व्यवहारिक, व्यावसायिक ज्ञान मिळण्यासाठी व त्यांच्या शिक्षणाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने त्या योगदान देत आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना कर्तृत्ववान महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राज्यातील रिक्त मंत्रीपदी आ.संग्राम जगताप यांना संधी द्या



आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा महिला आघाडीची मागणी

नगर - उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी राज्यात रिक्त अलेल्या मंत्रीपदी आमदार संग्राम जगताप यांना संधी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा आशा निंबाळकर यांनी केली आहे. मंत्री धनंजय मुंढे यांच्या राजीनाम्या नंतर राज्यात राष्ट्रवादीच्या कोट्यातील एक मंत्रिपद सध्या रिक्त आहे. या रिक्त मंत्रीपदी आ.संग्राम जगताप यांची वर्णी लावण्याची मागणी आशा निंबाळकर यांनी केली आहे. आ.संग्राम जगताप यांना जर मंत्रीपद दिले तर ते पूर्ण राज्यात आदर्शवत काम करून पक्षाचाही नावलौकिक वाढवतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या मागणीस उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करत प्रतिसाद दिला.

जिल्हा महिला आघाडीची नूतन कार्यकारिणी जिल्हाध्यक्षा आशा निंबाळकर यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत जाहीर केली. यावेळी आ.जगताप यांच्या हस्ते सर्व नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना निंबाळकर यांनी ही मागणी केली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, जिल्हा कार्यालयीन सचिव साईनाथ भगत, माजी उपमहापौर दीपक सूळ, अरुणा गोयल आदींसह पदाधिकारी उपस्थित होत्या.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - जिल्हाध्यक्ष आशा निंबाळकर, जिल्हा उपाध्यक्षा सुजाता कदम, स्मिता वाल्हेकर व संगीता ससे, नगर तालुका उपाध्यक्षा स्नेहल दरंदले, सरचिटणीस वनिता ठोंबे, जिल्हा सरचिटणीस कल्याणी गाडळकर, सरचिटणीस रोहिणी दळवी, कोषाध्यक्षा आश्विनी दळवी, सरचिटणीस स्वाती पवार, सरचिटणीस रुपाली तांबोळी, सचिव अश्विनी झरेकर, उपतालुका प्रमुख टिना लालबेग, जिल्हा चिटणीस अंबिका भिसे, सहसचिव दिपाली आढाव, सहसचिव भारती दिवटे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# जयंतीनिमित्त शिवसेना ठाकरे पक्षातर्फे छत्रपती शिवराय निबंध स्पर्धेचे आयोजन

## उर्दू भाषेतूनही लिहिता येणार निबंध, ५००० विद्यार्थी होणार सहभागी



नगर - शिवजयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर शहर शिवसेना ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवराय निबंध स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. पाच हजारहून अधिक विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. या माध्यमातून छत्रपती शिवरायांचे विचार उद्याचं राष्ट्राच भवितव्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. छत्रपती शिवरायांच्या दैदीप्यमान कर्तुत्वाचा जाज्वल्य इतिहास घराघरात पोहोचावा ही या मागची आमची भूमिका आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी यामध्ये भाग घ्यावा, असे आवाहन शहरप्रमुख किरण काळे यांनी केले आहे.

अहिल्यानगर शहर शिवसेना व शिक्षक सेनेच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन किरण काळे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले असल्याची माहिती शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख तथा स्पर्धा समन्वयक अंबादास शिंदे यांनी दिली आहे. इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या वयोगटासाठी स्पर्धा असणार आहे. निबंधासाठी पाचशे शब्दांची मर्यादा आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला व विनामूल्य असून २८ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्रवेशिका पाठवण्याची अंतिम मुदत आहे.

स्पर्धकांनी आपला निबंध स्कॅन करून पीडीएफ फॉरमॅटमध्ये ९३२५१८२५९५, ९९२२९१४२६४ या व्हाट्सअप क्रमांकांवर पाठवायचा आहे. तसेच shivsenaubtahilyanagargmail.com या ईमेल आयडीवर देखील निबंध पाठविता येतील. निबंध पाठविताना वरील बाजूस स्पर्धकाचे संपूर्ण नाव, इयत्ता, तुकडी, शाळेचे नाव, पालकांचे नाव व मोबाईल क्रमांक, संपूर्ण पत्ता नमूद करण्याचे आवाहन केले आहे.

स्पर्धेसाठी निबंधाचे पुढील दहा विषय देण्यात आले आहेत : १. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, २. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन, ३. छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती, ४. छत्रपती शिवाजी महाराजां कडून मराठा साम्राज्याची स्थापना, ५. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श, ६. छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य, ७. छत्रपती शिवराय एक आदर्श राजा, ८. मी छत्रपती शिवाजी महाराज बोलतोय, ९. आज छत्रपती शिवाजी महाराज असते तर, १०. छत्रपती शिवाजी महाराजांना पत्र.

प्रत्येक इयत्तेसाठी प्रथम पाच व पाच उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. याप्रमाणे प्रत्येक इयत्तेसाठी दहा अशी एकूण पन्नास बक्षीसे दिली जाणार आहेत. शालेय साहित्य, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे बक्षीसाचे स्वरूप आहे. स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सहभागा बद्दलचे प्रमाणपत्र देखील दिले जाणार असल्याचे म्हटले आहे.

### उर्दू भाषेतून लिहिता येणार निबंध

स्पर्धकांना चार विविध भाषांमधून निबंध लिहिता येणार आहेत. मराठी, हिंदी, इंग्रजीसह उर्दू भाषेतून देखील स्पर्धक निबंध लिहू शकतील. शिवसेना ठाकरे पक्षाच्या पुढाकारामुळे अहिल्यानगर शहरात पहिल्यांदाच या निमित्ताने छत्रपती शिवरायांवर उर्दू भाषेतून निबंध लेखन स्पर्धा पार पडत आहे.

### गँगस्टर्सचे उदात्तीकरण किळसवाणे

१८६९ मध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुलेंनी शिवजयंती उत्सव सुरू केला. जनतेने एकत्र येऊन अशा उत्सवांच्या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागवावं, शिवाजी महाराजांच स्मरण व्हाव, असा हेतू यामागे होता. पण मागील शिवजयंती मिरवणुकीमध्ये जगभर कुविख्यात असणाऱ्या लॉरेन्स बिश्नोई सारख्या गँगस्टरचे पोस्टर अहिल्यानगर शहरात झळकले. त्यामुळे शहराची भारतभर बदनामी झाली. गुन्हेगारीच उदात्तीकरण झालं. तरुण पिढीसमोर चुकीचे आदर्श ठेवले जात आहेत. हे समाजासाठी घातक आहे. स्व. अनिल राठोड हयात असताना तसं घडत नव्हतं. मिरवणुकांमध्ये कुणी दारू पिऊन आलं, चुकीचं कृत्य केलं तर ते अशा व्यक्तीला लगेच बाजूला करायचे. पण त्यांच्या पश्चात आता तसं राहिल नाही. म्हणूनच शहर शिवसेनेने छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार भावी पिढीच्या मनात रुजले जावेत यासाठी निबंध स्पर्धेच्या माध्यमातून त्यांना जाज्वल्य इतिहासाचा अभ्यास करण्या करिता प्रवृत्त करत व्यक्त होण्या करिता व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले असल्याचे किरण काळे यांनी म्हटले आहे.

## १८ मार्च रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी गौरवगाथा आधारित नृत्य, नाटय, पोवाडा कार्यक्रम

नगर - सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी गौरवगाथा आधारित नृत्य, नाटय आणि पोवाडा या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन येथे १८ मार्च रोजी सायंकाळी ६:३० वाजता माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर या ठिकाणी होणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये नृत्य उमेश चाबुकस्वार आणि संच, आरती क्रिएशन, नाट्य नंदू भुरे आणि कलाकार आणि शाहिर प्रविण जाधव आणि संच पोवाडा सादर करणार असून महेश अचिंतलवार यांच्या निवेदनाखाली हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशनच्यावतीने

# २१ व २७ मार्च दरम्यान आनंदधाममध्ये भगवान महावीर व्याख्यानमालेचे आयोजन



नगर - राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे २१ ते २७ मार्च दरम्यान सायंकाळी ७ वाजता आनंदधाममध्ये भगवान महावीर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

आनंदऋषिजी महाराज यांची शिकवण आणि विचारांनुसार कार्य करणाऱ्या जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेली ही व्याख्यानमाला गेल्या ३० वर्षांपासून (कोरोना वगळता) विनाखंड सुरू आहे.

२१ मार्चला प्रा.डॉ.विनोद बाबर (कराड) यांच्या ‘काही तरी चुकतंय आपलं’ या विषयावरील व्याख्यानाने याचा शुभारंभ करण्यात येईल. २२ मार्चला बीड येथील राहुल गिरी यांचे ‘भविष्यावर बोलू काही’ या विषयावर व्याख्यान होईल. २३ मार्चला लोककवी इंद्रजीत भालेराव (परभणी) यांचे ‘अरे माणसा माणसा’ या विषयावर व्याख्यान होईल. २४ मार्चला लेखक प्रो.नितीन लाठे (मुंबई) यांचे ‘आयुष्याचे गणित’ या विषयावर व्याख्यान होईल. २५ मार्चला उद्योजक व हेल्थ कोच अतुल शहा (मुंबई) यांचे ‘आहार आणि आरोग्य’ या विषयावर व्याख्यान होईल. २६ मार्चला अभिनेत्री सौ.गौरी थोरात (खामगाव) या ‘बाईपण भारी देवा’ या विषयावर व्याख्यान देतील. २७ मार्चला कीर्तनकार शंकर महाराज शेवाळे (पुणे) यांचे ‘थोडं जगणं समाजासाठी’ या विषयावरील व्याख्यानाने व्याख्यानमालेची सांगता करण्यात येईल.

व्याख्यानमालेमधील मार्गदर्शनाचा आणि वक्त्यांच्या प्रगल्भ विचारांचा श्रोत्यांना वैयक्तिक जीवनात निश्चितच लाभ होईल, असा विश्वास जैन सोशल फेडरेशन आणि लोढा परिवाराने व्यक्त केला आहे. म्हणूनच शहरातील आणि उपनगरातील नागरिकांनी भगवान महावीर व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



डॉ.ना.ज. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये एज्युकेशन फार्मसी डे साजरा करण्यात आला. (छाया - विजय मते)

# डॉ.पाऊलबुधेमध्ये नॅशनल एज्युकेशन फार्मसी डे साजरा

नगर - अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. ना.ज.पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये नॅशनल फार्मसी एज्युकेशन डे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला बीएडच्या प्राचार्या कॅम्पस इन्चार्ज डॉ.रेखाराणी खुराणा, बी फार्मसी चे प्राचार्य डॉ. श्याम पंगा, डी फार्मसी च्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, डॉ. वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत डी फार्मसी व बी फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी पेशंट कौन्सलिंग मध्ये फार्मसी चा रोल किती महत्त्वाचा असतो हे दर्शविणारे नाट्यप्रदर्शन सादर करण्यात आले.

डॉ.रेखाराणी खुराणा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना यशस्वी जीवन जगण्याचा कानमंत्र देत पुढील कारकिर्दीसाठी मार्गदर्शन केले.

डॉ.पंगा यांनी विद्यार्थ्यांना स्टार्ट अप अँड इनोवेशन प्रोग्राम अंतर्गत नवीन संशोधन करण्यास प्रेरणा दिली.

सूत्रसंचालन श्रद्धा मुंदडा यांनी केले. सुवर्णा येमुल यांनी आभार मानले.

# विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा होणार प्राइड ऑफ इंडिया नॅशनल अ‍ॅवॉर्डने सन्मान

## ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्यावतीने प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन; स्वयंसेवी संस्थांसाठी सीएसआर फंड मिळविण्यासंदर्भात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन





नगर - ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्यावतीने प्राइड ऑफ इंडिया नॅशनल अवॉर्डने सन्मानित केले जाणार आहे. तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांसाठी सीएसआर फंड मिळविण्यासंदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेच्या संचालिका सुप्रिया चौधरी, सारिका शेलार व संचालक प्रविण साळवे यांनी दिली.

ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनचा नॅशनल अवॉर्ड प्रदान सोहळा व एक दिवसीय कार्यशाळा महाबळेश्वर येथील द बाईक शांती व्हिला येथे १८ मे रोजी सकाळी होणार आहे. पुरस्कारासाठी प्रस्ताव आणि कार्यशाळेसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यात कलाविष्कार पुरस्कार, राष्ट्रीय खेल आयकॉन, राष्ट्रीय आदर्श अध्यापक पुरस्कार, सोशलवर्क आयकॉन पुरस्कार, राजनीतिक प्रेरणा पुरस्कार, राष्ट्रीय आदर्श विद्यालय, राष्ट्रीय सुजलाम सुफलाम ग्राम पुरस्कार, राष्ट्रीय आध्यात्मिक कार्य सन्मान पुरस्कार, राष्ट्रीय आरोग्य आयकॉन अवॉर्ड ऑफ इंडिया, आयकॉन ऑफ सोशल वर्किंग पुरस्कार, राष्ट्रीय उद्योजकता पुरस्कार, प्रशासनिक सेवा सहयोग पुरस्कार, राष्ट्रीय कृषी आयकॉन पुरस्कार, राष्ट्रीय पत्रकारिता, राष्ट्रीय आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान केले जाणार आहे. पुरस्कार्थींना प्रमाणपत्र, पदक आणि सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे.

तसेच समाजसेवेत नवी दिशा व भरीव काम करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये एनजीओ विविध कागदपत्रे व उपयोगिता एनजीओ प्रकल्प निर्मिती व फंड रेझिंग, कार्यपद्धती व असेसमेंट, गव्हर्मेंट प्रोजेक्ट, कागदपत्रे व कार्यपद्धती, सीएसआर प्रोजेक्ट, कागदपत्रे व कार्यपद्धती, एनजीओ स्वयंसेवक व संस्था, एनजीओ सदस्य नोंदणी व सहभाग, एनजीओ सोशल मीडिया मार्केटिंग व फंड रेझिंग या विषयावर तज्ञ मंडळी मार्गदर्शन करणार आहे.

कार्यशाळेसाठी पूर्व नोंदणी आवश्यक असून, https://forms.gle/J1Ne4gh6YY83c5oo7 या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे म्हटले आहे. तर अधिक माहितीसाठी ९४२३६७३५९१ व ९०२१०६६४९१ या नंबरवर संपर्क साधण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# उद्योगांसाठी स्वस्त दरात वीजपुरवठा करा

**महाराष्ट्रातील औद्योगिक विजेचे दर हे देशात सर्वाधिक : आमदार सत्यजीत तांबे**

नगर – महाराष्ट्रातील औद्योगिक विजेचे दर हे देशात सर्वाधिक असल्याने राज्यातील उद्योगधंद्यांवर मोठा आर्थिक ताण येत आहे. वाढत्या वीजदरांमुळे अनेक उद्योग अन्य राज्यांत स्थलांतर करण्याच्या तयारीत आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी उद्योगांना स्वस्त, मुबलक आणि अखंडित वीज मिळावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सभागृहात केली.



नाशिक येथील अंबड इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) या औद्योगिक संघटनेच्या विनंतीवरून आमदार तांबे यांनी हा मुद्दा सभागृहात मांडला. महाराष्ट्रातील औद्योगिक विजेचे दर इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहेत, तर सेवा–सुविधांच्या बाबतीत राज्य मागे आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योग टिकून राहावेत आणि अधिक सक्षम बनावेत, यासाठी स्वस्त दरात वीजपुरवठा होणे अत्यंत गरजेचे असल्याचे आ. सत्यजीत तांबे यांनी म्हंटले.

महाराष्ट्र देशातील प्रमुख औद्योगिक केंद्र असूनही, येथील उच्च वीजदरांमुळे उत्पादन खर्च वाढतो. परिणामी, वस्तूंच्या किमती वाढतात आणि उद्योगांना स्पर्धात्मक टिकाव धरणे कठीण जाते. यामुळे अनेक लघु, मध्यम आणि मोठे उद्योग इतर राज्यात स्थलांतर करण्याच्या विचारात आहेत. जर ही परिस्थिती कायम राहिली, तर महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

आमदार तांबे यांनी राज्य सरकारच्या महावितरण या वीज वितरण कंपनीने लघु व मध्यम उद्योगांसाठी सहकार्याची भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. उद्योगांना सवलतीच्या दरात वीज मिळाल्यास ते अधिक सक्षम होतील आणि रोजगारनिर्मिती वाढेल. तसेच, उद्योगांना पूर्ण दाबाची, अखंडित आणि विश्वासार्ह वीज उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचेही आ. तांबे यांनी अधोरेखित केले.

आमदार तांबे यांच्या या मागणीवर राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. उद्योगवाढ आणि वीजपुरवठ्याच्या समस्येवर अभ्यास करून आवश्यक उपाययोजना केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, राज्यातील उद्योगधंद्यांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असे सरकारने स्पष्ट केले.

### उद्योगांसाठी वीजदर कमी करण्याची गरज का?

महाराष्ट्रातील वाढत्या औद्योगिक वीजदरांमुळे अनेक उद्योगधंदे अन्य राज्यांत स्थलांतर करण्याच्या तयारीत आहेत. उच्च वीजदरांमुळे उत्पादन खर्च वाढत असून, त्याचा थेट परिणाम वस्तूंच्या किंमतींवर होत आहे. तसेच, राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी उद्योगधंद्यांचा विकास महत्त्वाचा असल्याने उद्योगांसाठी स्वस्त आणि अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करणे गरजेचे आहे.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या महिला प्रभागाच्या अध्यक्षा राजयोगिनी बी के चक्रधारी दीदी यांना इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड चा वुमन आइकॉन अवॉर्ड प्रदान करण्यात आला. पिसोळी, पुणे येथील जगदंबा भवन रिट्रीट एंड मेडिटेशन सेंटर मध्ये झालेल्या महिला मेळाव्यात इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड चे उपाध्यक्ष बी के डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. महिला प्रभागाच्या माध्यमातून आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांचा वुमन आइकॉन अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बी के नलिनी दीदी व जगदंबा भवन रिट्रीट एंड मेडिटेशन सेंटर च्या संचालिका राजयोगिनी बी के सुनंदा दीदी उपस्थित होत्या.



विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त ९ एप्रिल रोजी नगरमध्ये विशेष जाप कार्यक्रम या उपक्रमाच्या प्रचार पत्रकाचे अनावरण करण्यात आले.

# विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त नगरमध्ये ९ एप्रिलला 'विशेष जाप' कार्यक्रमाचे आयोजन

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) च्या वतीने संपूर्ण भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर ९ एप्रिल रोजी 'विश्व नवकार महामंत्र' दिवस भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. नगर शहरात यादिवशी धार्मिक परीक्षा बोर्ड येथे सकाळी ७.०२ ते ९.३६ यावेळेत नवकार जाप केला जाणार आहे. तसेच यावेळी धार्मिक गीत संगीत, सांस्कृतिक कार्यक्रमही रंगणार आहेत. या विश्वव्यापी उपक्रमात ७४ जितो चॅप्टर्स, ९ झोन, ३१ आंतरराष्ट्रीय चॅप्टर्स, १०८ देश, १०८ पेक्षा अधिक धार्मिक अनुष्ठान स्थळे, ६ हजारांहून अधिक जैन देरासर, उपाश्रय, स्थानकांतून भाविक सहभागी होणार आहेत. एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून सामूहिक नवकार महामंत्र जपाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे, अशी माहिती जितो अहमदनगरचे चेअरमन आलोक मुनोत, सेक्रेटरी तुषार कर्नावट यांनी दिली.

या उपक्रमाच्या प्रचार पत्रकाचे अनावरण नुकतेच करण्यात आले. यावेळी इंदिरा मुनोत, गौतम मुनोत, अमित मुथा, अक्षय नरेंद्र बाफना, अभिजित विनोद गांधी, सुधीर, निलेश चोपडा, आलोक मुनोत, तुषार कर्नावट, विजय गुगळे, अमित पोखरणा, सौरभ भंडारी, प्रितेश दुगड, पारस चुडीवाल, सुमंगला मुनोत, प्रणिल मुनोत, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी, गौतम मुथा, खुशबू मुनोत, निखिल गांधी, ऋषभ बोरा, रितेश पटवा, सूरज कर्नावट, लेडीज विंग सेक्रेटरी अंशु मुनोत, सोनाली डुंगरवाल, वैशाली ओस्तवाल आदी उपस्थित होते.

या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे हा आहे. प्रत्येकाने आपल्या शहरातील, गावातील प्रमुख धार्मिक स्थळे, समाज, प्रतिष्ठित व्यक्ती आणि श्रद्धाळूंना या महान कार्यात सहभागी घ्यावे. स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त भाविकांनी नजीकच्या स्थानकात किंवा घरी बसूनही माळ जपावी.

या ऐतिहासिक प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी नवकार महामंत्राचे महत्त्व संपूर्ण भारतासमोर सादर करणार आहेत. याशिवाय देशातील दिग्गज राजकारणी, गौतम अदानी, मुकेश अंबानी यांच्यासह मोठे उद्योजक, बॉलिवूड स्टार, दिग्गज खेळाडू, सेलिब्रिटींही यात सहभागी होणार आहेत. अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे की नवकार महामंत्राची शक्ती आणि महत्त्व आज जागतिक स्तरावर मान्यता मिळवत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाचा भाग होण्यासाठी अधिकाधिक भाविकांची नोंदणी क्यु आर कोड द्वारे किंवा ऑनलाईन लिंकवर करावी असे आवाहन जितो अहमदनगरच्या वतीने करण्यात आले आहे.

# शासन दरबारी तसेच प्रशासकीय पातळीवर दिव्यांगांची ससेहोलपट

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनता दरबारात मांडल्या आपल्या व्यथा**



पालकमंत्र्यांच्या जनता दरबारात दिव्यांगांच्या व्यथा मांडताना ॲड. लक्ष्मणराव पोकळे, विजय हजारे, संजय बालटे, पोपट शेळके आदी.

नगर – शासन दरबारी तसेच प्रशासकीय पातळीवर असलेल्या दिव्यांगांच्या विविध मागण्यांची पुर्तता करावी तसेच दिव्यांग हक्क कायदा २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी या मागण्यांचे निवेदन प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना १६ मार्च रोजी नगरमध्ये झालेल्या जनता दरबारात देण्यात आले.

या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, दिव्यांग हक्क कायदा २०१६ संसदेत पास झाले नंतर दोन वर्षात त्यांची प्रभावी अंमल बजावणी होण्यासंबंधी सक्त निर्देश देण्यात आले होते. असे असताना देखील आज तागायत दिव्यांगांच्या अनेक मागण्यांची अंमलबजावणी झालेली नाही. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने देखील वेळोवेळी शासन निर्णयासंबंधी परिपत्रके काढली. अपंगांचे दैवत बच्चुभाऊ कडू यांनी अपंगांच्या प्रश्नाविषयी सभागृहात आणि सभागृहाबाहेरही या विषयी आवाज उठविला परंतू दिव्यांग हक्क कायदयाची अंमल बजावणी व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन निर्णय हे केवळ कागदावर राहिले. जमिनीस्तरावर त्यांची प्रभावी अंमल बजावणी झालेली नाही.

दिव्यांग अनेक योजनांचा लाभ मिळवण्यापासून वंचित राहतात. तरी अशा दिव्यांगांना उत्पन्नाचा दाखला देताना त्याचे एकत्रीत कुटुंबाचे उत्पन्न न धरता त्यांना स्वतंत्र असा उत्पन्नाचा दाखला देण्यासंबंधीचे आदेश देण्यात यावेत. कोणताही प्रश्न चर्चा व परस्पर समन्वयानेच सूटू शकतो. यावर आमचा विश्वास आहे. परंतू अधिका–यांच्या अनास्थेमुळे दिव्यांगांचे प्रश्न हे वर्षानुवर्षे रेंगाळत आहे. त्यामुळे दिव्यांगांची ससेहोलपट होत आहे.

त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व समाजात सन्मानाने जगता यावे, यासाठी जिल्हयातील गटविकास अधिकारी, बीडीओ, तहसीलदार, नगरपालिका व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त यांची वरील मागण्यांच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आमच्या संघटनेच्या राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय प्रतिनिधीमंडळाची संयुक्त बैठक घेण्यात यावी. जेणे करुन आम्हाला आंदोलन करण्याची वेळ येणार नाही. तरी सदरच्या बैठकीची सुयोग्य तारीख आम्हास कळवावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. या वेळी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष ॲड. लक्ष्मणराव पोकळे, शहर अध्यक्ष विजय हजारे, शहर सचिव संजय बालटे प्रसिध्दी प्रमुख पोपट शेळके व इतर सदस्य उपस्थित होते.

## शेख सिदरा फातेमा हिचा पहिला रोजा

नगर – बाबा बंगाली येथील इलेक्ट्रीशियन शेख शेरअली यांची मुलगी शेख सिदरा फातेमा (वय ७) याने रमजानचा पहिला रोजा पुर्ण केला.



सिदरा फातेमा ही मुकुंदनगर येथे मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कुलमध्ये पहिलीत शिकत आहे. त्याने एवढ्या कडक उन्हात व एवढे कमी वयात रोजा केल्याबद्दल त्याचे सर्व शिक्षक नातेवाईक अल करम सोसायटी तर्फे कौतुक होत आहे.

## चंदन प्लास्टिकला भीषण आग; सुदैवाने जीवितहानी टळली मात्र कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान

नगर – जामखेड रोडवर नगर तालुक्यातील सारोळा बद्धी येथील प्लास्टिक ताडपत्री बनविणारी चंदन प्लास्टिक ही कंपनी १६ मार्च रोजी सकाळी अकराच्या सुमारास आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे कारण स्पष्ट झालेले नाही. आगीत कंपनीची मोठी आर्थिक हानी झाली.

रविवारी सकाळी अकराच्या सुमारास सारोळा बद्धी येथील प्लास्टिक ताडपत्र्या बनविणाऱ्या कंपनीस अचानक आग लागली. काही क्षणातच धुराचे लोळ बाहेर पडू लागले. आगीने रौद्ररूप धारण केले. ही माहिती अहिल्यानगर महापालिकेच्या अग्निशमन दलास देण्यात आली.



जवान तत्काळ दोन बंब व तीन मोठे पाणी टँकरसह घटनास्थळी पोहोचले व मदतकार्य सुरू केले. त्यानंतर एमआयडीसी, राहुरी नगरपालिका, एमआयआरसीच्या अग्निशमन दलाचीही मदत घेण्यात आली. रात्री उशिराही आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. यात स्थानिक ग्रामस्थांनीही वैयक्तिक पाणी टँकर आणून आग आटोक्यात आणण्यासाठी मदत केल्याची माहिती मनपाचे मुख्य अग्निशमन अधिकारी शंकर मिसाळ यांनी सांगितली.

आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागाचे प्रमुख शंकर मिसाळ, वाहन चालक अशोक काळे, अंकुश कुटे, सिकंदर वाकरे, चंदू भांगरे, फायरमन मोहन रासकर, सागर जाधव, अशोक चितळे, करण राठोड, संदेश सांगळे, सूरज कारले, संकेत साठे, अविनाश साठे, धीरेश जावळे, शुभम साठे, प्रभात साठे आदींसह इतर जवानांनी प्रयत्न केले.

# ज्यूस गाडी ते लाल दिव्याची गाडी स्व.दिलीप गांधी यांचा संघर्षमय प्रवास



माणसाने जर ठरविले तर तो काहीही करु शकतो. स्वतःच्या जिद्द व चिकाटीच्या जोरावर आयुष्यभर संघर्ष करत यशस्वी झालेले नेतृत्व म्हणजे माजी केंद्रीय मंत्री स्व. दिलीप गांधी. अल्पसंख्याक समाजातून व सर्वसामान्य कुटुंबातून वर येत ज्यूस गाडीचा व्यवसाय करणारे, बेताचीच आर्थिक परिस्थिती, कुठल्याही राजकीय वारसा नाही, सामाजिक कामातून सर्वसाधारण लोकांना व सर्व समाजाला मदत करण्याच्या भावनेतून केलेले कार्य यामुळे दिलीप गांधी यांनी गल्लीतून दिल्ली गाठली. पक्षांतर्गत होणाऱ्या विरोधावर मात करत प्रस्थापितांच्या व साखर सम्राटांच्या या जिल्ह्यात खडकावर कमळ फुलवण्याची कामगिरी दिलीप गांधींनी केले. संघर्ष करत तीनवेळा विजयाची हॅटट्रिक करत खासदार होणारे गांधी हे एकमेव नेते आहेत. ज्यूस गाडी ते लाल दिव्याची गाडी हा स्व.दिलीप गांधी यांचा संघर्षमय प्रवास थक्क करणारा आहे.

१९८० साली तत्कालीन भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष गुलशन जग्गी यांनी दिलीप गांधी या युवकला भाजपचे सदस्य करून राजकीय प्रवाहात आणले. जिल्हा भाजपचे युवा मोर्चाचे अध्यक्ष, जिल्हा संघटन सरचिटणीस अशा विविध पदांवर काम करत शहरात व जिल्ह्यात भाजपची ताकद वाढवली. १९८५ साली नगरपालिकेच्या निवडणूकीत नवनीतभाई बार्शिकर यांच्या सारख्या दिग्गज मातब्बर नेत्याचा पराभव करुन नगरसेवक झालेले दिलीप गांधी यांच्या रुपाने नगर शहराला व जिल्ह्याला एक नवे नेतृत्व मिळाले. तत्कालीन नगरपालिकेचे उपनगराध्यक्षपद भूषवत त्यांनी नगर शहराच्या विकासासाठी योगदान देण्यास सुरवात केली. त्यावेळी एका माथेफिरूने केलेल्या चाकूहल्ल्यात गांधी जखमीही झाले होते. १९९२ साली पुन्हा नगरसेवकपदी विजयी झाले. जिल्ह्यात पक्षाचे काम वाढवत मोठा जनसंपर्क केला. त्यामुळे भाजपातील अनेकांनी गांधी पुढे जाईल म्हणून त्यांना वेसण घालण्याचा प्रयत्न केला. पण पक्षांतर्गत विरोधावर मात करत गांधींनी काम सुरूच ठेवले. १९९९ सालच्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपने अगदी शेवटच्या क्षणी दिलीप गांधी यांना तिकिट दिले. त्यांनी जिद्द न सोडता, मोजक्या कार्यकर्त्यांच्या साथीने, जनतेच्या पाठबळावर व अल्प खर्चात त्यांनी प्रस्थापितांच्या विरोधात निवडणूक जिंकली. त्यांचा हा विजय राज्यात आदर्श ठरला. अनेक दिग्गजांनी गांधीचे कौतुक केले होते. यानंतर दिलीप गांधींनी कधीही मागे वळून पहिले नाही.

खासदार झाल्यावर मतदारसंघातील खेडोपाडी दौरे करत खासदार निधीतून विकास कामांना सुरुवात केली. त्यावेळी खासदार निधीतून विकास होत असतो हेच सामन्य जनतेला माहित नव्हते. त्यामुळे दक्षिणेतील भागाला दिलीप गांधी यांनी सर्वप्रथम खासदार निधी दाखवला. तळमळीने मतदार संघाच्या विकासासाठी काम करत जिल्ह्यात प्रथमच विविध खात्यांच्या केंद्रीय मंत्र्यांना मतदार संघात आणून विकासाची गंगा आणली. दिलीप गांधींची मतदार संघाच्या विकासासाठीची तळमळीची दखल घेत तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी त्यांना केंद्रात राज्यमंत्रीपद बहाल केले. केंद्रीय जहाज बांधणी राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी देशात उत्कृष्ट काम केले. मंत्री झाल्यावर मतदार संघातील ग्रामीण भागातील छोट्या छोट्या वाड्या वस्त्यांवर, पाल्यावरही लाल दिव्याची गाडी नेत विकासास चालना दिली.

२००४ साली भाजपने दिलीप गांधींचे लोकसभेचे तिकिट कापले. तरीही पक्ष निष्ठा कायम बाळगून भाजपचे काम करत राहिले. इतर मोठ्या पक्षाचे अनेक प्रलोभने आली पण मला भाजपाने खूप काही दिले आहे असे म्हणत ते कायम पक्षाशी एकनिष्ठ राहिले. ५ वर्षांनंतर २००९ साली पक्षाने पुन्हा दिलीप गांधींना लोकसभेची उमेदवारी दिली. ही निवडणूकही सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर जिंकली. त्यावेळी विरोधी पक्षाचे सरकार असतानाही त्या सरकार मधील अनेक केंद्रीय मंत्र्यांना दक्षिण मतदार संघात आणून विकास कामे सुरूच ठेवली. त्यावेळी आलेल्या मोठ्या आजारपणावरही त्यांनी स्वतःच्या इच्छाशक्तीच्या बळावर मात केली. २०१४ साली गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवून मोठा विजय मिळवला. त्यावेळी केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत मातारदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी मंजूर करून आणला. यात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला नगर शहरातील उड्डाणपूल, बायपास रस्त्याच्या कामास मंजुरी मिळवून मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमिपूजनही केले होते. तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्येही केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजनांची प्रभावी अमलबजावणी करत मतदार संघात मोठी विकासकामे त्यांनी मार्गी लावली. ग्रामीण भागातील जनतेची प्रलंबित कामे मार्गी लागण्याने दिलीप गांधी यांनी या समान्य जनतेच्य मनात घर केले आहे.

स्वतःच्या हिमतीवर व जनतेच्या पाठबळावर तीन वेळा खासदार व एकवेळा केंद्रीय मंत्रीपदी राहिलेले दिलीप गांधी यांचे १७ मार्च २०२१ साली निधन झाले. त्यांच्या निधनाने भाजपाचे व नगर दक्षिण भागाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. स्व.दिलीप गांधी यांच्या कार्यकर्तृत्वाच्या अशा खूप आठवणी आहेत.

**शब्दांकन : सुनील रामदासी,** भारतीय जनता पार्टी

# जागतिक स्तरावर होणाऱ्या आनंद सप्ताहाचे १८ ते २३ मार्च दरम्यान नगरमध्ये आयोजन

नगर – आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगरच्या वतीने जागतिक आनंद सप्ताह निमित्ताने निरोगी जीवनासाठी १८ ते २३ मार्च दरम्यान श्री गजाजन हॉल, चौपाटी कारंजा, महाराष्ट्र बँकेच्या बाजूस बेसमेंट, दिल्लीगेट अहिल्यानगर येथे सकाळी ६ ते ९ वाजता योग–ध्यान, प्राणायम, सुदर्शन क्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात शारीरिक, मानसिक तणावमुक्त, आरोग्यदायी जीवन या विषयावर मार्गदर्शन व योग–ध्यान, प्राणायम, प्रात्याक्षिके करुन घेण्यात येणार आहे. निरंतर सुदर्शन क्रिया अभ्यासाने अनेक लोक सुखी जीवन जगत आहेत.

दैनंदिन जीवनात संघर्ष, ताण–तणाव, व्यसनमुक्तीसाठी आपणहून केलेले प्रयत्न, नैराश्य व चिंता या गोष्टी होत असतात. आर्ट ऑफ लिव्हींगच्या आनंद उत्सव या शिबीराद्वारे श्री श्री रविशंकरजी यांचे प्रेरणेने ठिकठिकाणी शिबीराचे आयोजन केले जाते. या शिबिर मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंगचे आध्यात्मिक गुरू रविशंकरजी संबोधित करणार आहेत आणि दुःख तणावमुक्तिसाठी वारंवार होणाऱ्या शिबीरास चांगला प्रतिसाद देखील मिळातो. लोकांना याचे सकारात्मक ऊर्जा, लाभ मिळत आहे, योग आणि प्राणायम प्राचीन भारतीय पद्धती आहे, ज्याद्वारे शरीर, मन चांगले राहते आणि विचार करण्याची क्षमता, योग्य निर्णय घेण्यासाठी समर्थ बनविते. शारिरीक व मानसिक स्वास्थासाठी याचा अवलंब करावा, आपले शरीर सूक्ष्म प्राणशक्तींशी संबंधित असल्याने त्यांचा सराव नियमीत केल्या मानसिक शांती व आरोग्य चांगले राहते, सध्याच्या गतीमान जीवनशैलीमुळे आपले जीवन धकाधकीचे झालेले असून प्रत्येक स्तरावर ताण–तणाव, नैराश्य, चिंता या अश्या अनेक कारणांमुळे आपले आरोग्य बिघडत चालले आहे, निसर्गात होणार्या बदलामुळे आपले शरीरात वात, कफ, पित्त यामध्ये सुद्धा बदल होत असतात. आज प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, त्यामळे आनंदमयी आयुष्य जगायचे असेल तर आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावे लागेल. नियमीत सुर्यनमस्कार, व्यायाम केल्याने आपले शरीर व मनशांती ध्यानाद्वारे टिकून ठेवता येणे शक्य आहे. निरंतर योग साधना करण्यार्या माणसांची ऊर्जा चांगली राहते, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

या शिबीरात सहभागी व्हावे, असे आर्ट ऑफ लिव्हींग, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले. अधिक माहितीसाठी ९१३०३७७५५१, ९४२२२२०८७४.

# गुढीपाडवा आणि रमजान ईद मुळे २८ मार्चपर्यंत शिक्षकांचे पगार करावे

नगर – ३० मार्च रोजी गुढीपाडवा आहे. हिंदू नववर्ष गुढीपाडव्याला सुरु होते. देशात हा सण मोठया उत्साहात साजरा केला जातो. तसेच ३१ मार्च रोजी रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण आहे. गुढीपाडवा आणि रमजान ईद हे सण लक्षात घेऊन राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च पेड इन एप्रिलचे पगार २८ मार्च पूर्वी वितरीत करण्यात यावेत, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आल्याची माहिती शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिले.

महागाईच्या काळामध्ये शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी २८ मार्चपर्यंत शिक्षकांचे पगार करावे असे त्यांनी सांगितले. पगार वेळेवर होण्याबाबत शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना उचित आदेश द्यावेत, अशी ही मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानित च्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी केली.

# केडगावच्या बायपास जवळ बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने लावला पिंजरा

नगर – केडगाव मधील बायपास चौका लगत असलेल्या कांबळे वस्ती जवळील सलीम रंगरेज यांच्या शेतात १५ मार्चला रात्री बिबट्या दिसल्याने या भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. याची माहिती मिळाल्यावर वनपारिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनानुसार वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने भेट देत पाहणी केली. तसेच बिबट्याला पकडण्यासाठी १६ मार्चला या परिसरात पिंजरा लावण्यात आला आहे.



या भागात बिबट्या दिसल्याचा व्हिडीओ काही नागरिकांनी काढला होता तसेच या ठिकाणी बिबट्याच्या पावलांचे ठसेही आढळून आले. या ठिकाणी दोन दिवसांपूर्वी बिबट्याने एका कालवडीची शिकार केली होती. याची गांभीर्याने दखल घेत रविवारी सकाळी वनरक्षक विजय चेमटे, चालक संदीप ठोंबरे, वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारीया यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच परिसरातील नागरिकांना काही सूचना केल्या. बिबट्याला पकडण्यासाठी सायंकाळी या भागात पिंजरा लावण्यात आला आहे.

केडगाव परिसरात बिबट्याचे वास्तव्य या आधीही आढळून आले आहे. नागरिकांनी कोणत्याही आफवांवर विश्वास ठेऊ नये तसेच खोट्या भीती व गैरसमज पसरवणाऱ्या व्हिडीओ क्लिप सोशल मीडियावर प्रसारित करू नये, असे आवाहन वनपारिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी नागरिकांना केले आहे.

